॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव- ४२५००१

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON- 425001

Grade-B (2.88)
(NAAC Re-Accredited)

P.B.NO. 80, UMAVI NAGAR, JALGAON – 425 001 (M.S.)

**जा.क्र.उमवि/5/टे.क्र.01/32/2010** **दिनांक: 27/01/2010**

प्रति,
विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य
तसेच मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक

**विषय:- संलग्नीत महाविद्यालयाचा/परिसंस्थेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्यादृष्टीने करावयाच्या कार्यवाहीबाबत........**

**महोदय,**

विद्यापीठ नेहमीच संलग्नीत महाविद्यालयांचा/परिसंस्थांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीकोनातून वेळोवेळी महाविद्यालयांना/परिसंस्थांना मार्गदर्शन व सूचना करीत असते, याची आपणांस कल्पना आहेच.

शैक्षणिक वर्ष 2010-2011 सुरु होण्यापूर्वी महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी विविध उपाययोजना आपल्या स्तरावरुन करावयाच्या आहेतच. त्यातील काही बाबी खालीलप्रमाणे असाव्यात, असे मा.कुलगुरु महोदयांनी सूचित केले आहे.

(1) आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या संगणकीय युगात प्रत्येक महाविद्यालयाकडे/परिसंस्थेकडे त्यांचे स्वतंत्र संकेतस्थळ (website) असणे गरजेचे आहे. सदर संकेतस्थळावर महाविद्यालयाने/परिसंस्थेने त्यांचेसंदर्भातील सर्व माहिती, उदा. महाविद्यालयाचे/परिसंस्थेचे नांव, स्थापना वर्ष, शासनाने महाविद्यालय/परिसंस्था सुरु करणेस दिलेल्या मान्यता पत्राचा क्रमांक व दिनांक, विद्यापीठाने संलग्नता मान्य केलेले वर्ष, कायम संलग्नीकरण असेल तर त्याविषयीची माहिती, शिकविले जाणारे अभ्यासक्रम, त्या अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता, सदर अभ्यासक्रम शिकविण्यासाठी नियुक्त केलेले शिक्षक, त्यांची शैक्षणिक पात्रता, अनुभव, महाविद्यालय पुरवित असलेल्या सोयी-सुविधा, वसतीगृह इत्यादि व इतर अनुषंगिक असलेली परिपूर्ण माहिती प्रसिध्द करावी.

(2) राष्ट्रीय प्रत्यायन व मुल्यांकन परिषद [NAAC], बंगळूर यांचेमार्फत महाविद्यालयाचे मुल्यांकन करण्यासाठी पात्र असलेल्या महाविद्यालयांनी त्यांचे मुल्यांकन करुन घेण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत. तसेच जी महाविद्यालये/परिसंस्था NBA मानांकनासाठी पात्र असतील, त्यांनी NBA मानांकन प्राप्त करुन घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

(3) ज्या महाविद्यालयांनी राष्ट्रीय प्रत्यायन व मुल्यांकन परिषद [NAAC], बंगळूर यांचेकडून महाविद्यालयाचे मुल्यांकन करुन घेतलेले आहे व ते पुनर्मुल्यांकनासाठी पात्र झाले आहेत, अशा महाविद्यालयांनी त्यांचे पुनर्मुल्यांकन करुन घेण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत.

(4) महाविद्यालयाचा शैक्षणिक व प्रशासकीय कारभार नियोजनबध्द व सुसूत्रितपणे चालण्याच्या दृष्टीकोनातून परिनियम 413 (बी) मधील कार्यपध्दती अनुसरुन महाविद्यालयामध्ये नियमित प्राचार्यांची नियुक्ती करण्यांत यावी. तसेच मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये नियमित संचालकांची नियुक्ती करण्यांत यावी. नियुक्त केलेल्या प्राचार्य/संचालकांच्या नियुक्तीस विद्यापीठाच्या व्याख्याता मान्यता विभागाकडून मान्यता घेण्यांत यावी.

...2

**PHONE: (0257) 2257255, 2257223** Fax No. : (0257) 2258409/406
**Web Site : www.nmu.ac.in** **E-mail: ar-dev@nmu.ac.in**
**bcud_nmu@hotmail.com**
**so-affiliation@nmu.ac.in**

(5) महाविद्यालयामध्ये/परिसंस्थांमध्ये शिकविल्या जाणा-या सर्व अभ्यासक्रमांसाठी यु.जी.सी., ए.आय.सी.टी.ई. तसेच विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातील तरतूदी विचारात घेऊन कार्यभारानुसार आवश्यक तेवढ्या नियमित शिक्षकांची परिनियम 415(1) नुसार नियुक्ती करण्यांत यावी व नियुक्तीस विद्यापीठाच्या व्याख्याता मान्यता विभागाकडून मान्यता घेण्यांत यावी.

(6) महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या होणा-या खर्चाचे वेळोवेळी लेखा परीक्षण करुन घेण्यांत यावे, तसेच ताळेबंद व लेखा परीक्षण अहवाल महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर दरवर्षी प्रसिध्द करण्यांत यावा आणि त्याची एक प्रत विद्यापीठास पाठवावी.

(7) महाविद्यालयात/परिसंस्थेत शिकविल्या जाणा-या अभ्यासक्रमांसाठी आवश्यक त्या पायाभूत सोयी-सुविधा, जसे - इमारत, वर्ग खोल्या, बेंचेस, संगणक, प्रयोगशाळा, प्रयोगशाळांमधील साहित्य इत्यादि उपलब्ध करुन देण्यांत याव्यात.

वरीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत वेळोवेळी विद्यापीठामार्फत महाविद्यालयास सूचित करण्यांत आलेले आहेच. त्यातील ब-याचशा बाबी महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी पूर्ण केल्या असतीलच. ज्या महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी याबाबत अद्याप पूर्तता केलेल्या नसतील त्यांनी सदर बाबींची पूर्तता करुन दिनांक 31 मार्च, 2010 पावेतो पूर्तता अहवाल विद्यापीठाच्या संलग्नता विभागात सादर करावा. सादर करावयाच्या पूर्तता अहवालाचा नमुना [format] विद्यापीठाच्या ***www.nmu.ac.in*** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येत असून सदर पूर्तता अहवाल याच नमुन्यात स्विकारला जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक 31 मार्च, 2010 पावेतो वरील मुद्यातील **काही बाबींची** पूर्तता करणे शक्य नसल्यास सदर बाबींची पूर्तता कोणत्याही परिस्थितीत दिनांक 31 मे, 2010 पावेतो पूर्ण करावी, परंतु दरम्यान दिनांक 31 मार्च, 2010 पावेतो संबंधित मुद्यांसंदर्भात महाविद्यालयाने कोणती कार्यवाही केलेली आहे, याबाबतचा अहवाल दिनांक 31 मार्च, 2010 पावेतो संलग्नता विभागास सादर करावयाचा आहे. अहवालासोबत दिनांक 31 मार्च, 2010 ते 31 मे, 2010 या कालावधीमध्ये महाविद्यालय कोणती कार्यवाही करणार आहे, याबाबतचा स्वतंत्र अहवाल सोबत जोडण्यांत यावा.

वरीलप्रमाणे पूर्तता अहवाल प्राप्त झाल्याशिवाय विद्यापीठामार्फत शैक्षणिक वर्ष 2010-2011 चे नुतनीकरण मान्य केले जाणार नाही व त्याअनुषंगाने संबंधीत महाविद्यालयाचे/परिसंस्थेचे प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्यात येतील व तदनुषंगिक होणा-या परिणामास संबंधित महाविद्यालय/परिसंस्था व त्यांचे व्यवस्थापन जबाबदार राहील, याची नोंद घेऊन उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करुन आपला पूर्तता अहवाल सी.डी.व्दारे सॉफ्ट कॉपीमध्ये तसेच दोन हार्ड प्रतीमध्ये विहीत मुदतीत विद्यापीठाच्या संलग्नता विभागास सादर करावा.

**म.कळावे,**

आपला विश्वासू,

**(प्रा.डॉ.सु.भा.चिंचोलकर)**
संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत माहितीसाठी सविनय सादर:-

1) मा.कुलगुरुंचे कार्यकारी सहायक.
2) मा.कुलसचिव कार्यालय.

**PHONE: (0257) 2257255, 2257223**
**Web Site : www.nmu.ac.in**
Fax No. : (0257) 2258409/406
**E-mail: ar-dev@nmu.ac.in**
**bcud_nmu@hotmail.com**
**so-affiliation@nmu.ac.in**